# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ । पान १


# बारणे यांचा संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराने गौरव

## हा पुरस्कार मावळच्या जनतेला अर्पण करतो : खासदार श्रीरंग बारणे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

लोकसभेतील उपस्थिती, जनहिताचे उपस्थित केलेले प्रश्न, चर्चेतील सहभाग, खासगी विधेयक आणि अनुकरणीय सर्वोत्तम कामगिरीसाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांना संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराने दिल्लीत गौरविण्यात आले. हे केवळ मावळच्या जनतेमुळे शक्य झाले. त्यामुळे हा पुरस्कार मावळच्या जनतेला अर्पण करत असल्याची प्रतिक्रिया खासदार बारणे यांनी दिली. दरम्यान, पुरस्कार मिळाल्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही खासदार बारणे यांचा सत्कार केला.लोकसभेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना प्राईम पॉईंट फौंडेशनतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. माजी राष्ट्रपती




डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या संकल्पनेतून हा पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. तेलंगनाच्या राज्यपाल डॉ. तमिलीसाई सौंदरराजन, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या हस्ते खासदार बारणे यांना १७ व्या लोकसभेतील कामगिरीसाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयकुमार मिश्रा, निवृत्त न्यायाधीश संजयकुमार कौल, प्राईम पॉईंट फौंडेशनचे श्रीनिवासन, प्रियदर्शनी राहुल उपस्थित होते. चालू १७ व्या लोकसभेत खासदार बारणे यांच्या कामगिरीतील सातत्य कायम आहे. त्यांनी ६३५ प्रश्न विचारले आहेत. १६६ चर्चामध्ये सहभाग घेतला तर, १३ खासगी विधेयके मांडली आहेत. खासदार बारणे यांची सभागृहात ९४ टक्के उपस्थिती आहे. या कामगिरीसाठी त्यांना संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. तर, याच संस्थेचा संसदरत्न पुरस्कार त्यांना सलग पाच वेळा प्रदान करण्यात आला आहे. महासंसद रत्न पुरस्कार, विशिष्ट संसदरत्न पुरस्कार एकवेळा मिळाला. आता विशिष्ट संसदरत्न पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. संसदेतील सातत्यपूर्ण सर्वोत्तम कामगिरी आणि त्याच वेळी आपल्या मतदार संघातील नागरिकांसाठी जनहिताची केलेली कामे यांचा या पुरस्कार निवडीसाठी विचार करण्यात आला आहे.संसदेत उपस्थित राहणे, मतदारसंघातील प्रश्नांवर आवाज उठविण्याबरोबरच लोकांमध्ये मिसळणे, चोवीस तास उपलब्ध असणारे खासदार अशी श्रीरंग बारणे यांची ओळख आहे. नम्र, सतत लोकांना भेटणे, त्यांच्या अडी-अडचणींना धावून जाणे, सुख, दु:खात सहभागी होतात. दोन जिल्ह्याला जोडणारा मतदारसंघ असतानाही खासदार बारणे हे सातत्याने मतदारसंघात असतात. त्यामुळे लोकांमधील खासदार अशी बारणे यांची मतदारसंघात ओळख आहे.खासदार बारणे यांनी केवळ संसदेत आवाज उठविला नाही. तर, प्रत्यक्षात जमिनीवर काम देखील केले आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच मावळमधील आदिवासी पाडे, वाड्या वस्त्यांवर वीज, रस्त्यांची सुविधा निर्माण केली. गावा-गावांमधील अंतर्गत रस्ते, पाण्याची सुविधा सक्षम केली. पिंपरीत पासपोर्टचे कार्यालय सुरु केले. क्रांतिवीर चापेकर बंधुंच्या नावाने टपाल तिकीटाचे प्रकाशन केले. भारत सरकारच्या हिंदुस्थान अँटिबायोटिक कंपनीला आर्थिक मदत मिळवून दिली. पवना, इंद्रायणी नदी सुधारच्या प्रकल्पाला गती दिली आहे. रेल्वेचे जाळे विस्तारले जात आहे. पनवेल ते उरण लोकल सेवा चालू केली. पनवेल ते कर्जत या रेल्वे मार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. अमृत भारत रेल्वे स्टेशन योजने अंतर्गत समावेश रेल्वे स्थानकांचा कायापालट केला जात आहे. लोणावळा ते पुणे या दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकच्या कामाचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

# मोशीत उद्या एक गाव एक शिवजयंती!

## शिवज्योतीचे समस्त मोशी ग्रामस्थ व मान्यवरांच्या हस्ते स्वागत

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर मातीच्या कणावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे राजा शिवछत्रपती... अशा श्री छत्रपती शिवाजी महाराजांची 'एक गाव एक शिवजयंती' या ब्रीदासह मोशी ग्रामस्थांच्यावतीने सोमवारी (ता.१९) छत्रपती श्री संभाजी महाराज चौक येथे दिमाखदार असा शिवजयंती महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने पहाटे साडेपाचला शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला महाभिषेक केला जाणार आहे. त्यानंतर, किल्ले



शिवनेरी येथून पायी आलेल्या शिवज्योतीचे समस्त मोशी ग्रामस्थ व मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात येणार आहे. मोशी टोलनाका ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत महिलांची भव्य दुचाकी फेरी, सायं. ५ ते ७ यावेळेत अश्विनी सुधीर बुचडे यांचे सुश्राव्य भजन, सायं. ७ ते ९ वाजता कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे हरिकीर्तन होणार आहे. मंगळवारी (ता.२०) सायं. ६ वाजता राजे श्री शिवछत्रपती व प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीची पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

# तिसऱ्यांदा मिळालेला 'संसदरत्न पुरस्कार' मायबाप जनतेला समर्पित

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
कर्तव्यपूर्तीचे समाधान आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा हा पुरस्कार मी शिरूर लोकसभा मतदारसंघातील मायबाप जनतेला समर्पित करतो अशा शब्दांत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.आज नवी दिल्ली येथे संसदरत्न पुरस्कार सोहळा संपन्न झाला, त्यानंतर खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पहिल्याच टर्ममध्ये तिसऱ्यांदा संसदरत्न पुरस्कार स्वीकारताना अतिशय आनंद होत असल्याचे सांगत शिरूर लोकसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने मला सेवेची संधी दिली. जनतेचा




आशीर्वाद स्वीकारून त्यांच्या प्रश्नांसाठी संसदेत आवाज उठवला. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सभागृहात संघर्ष केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवताच निलंबन झाले, मात्र स्वस्थ न बसता थेट रस्त्यावर उतरून आक्रोश मोर्चा काढून लढा दिला. त्याचबरोबर शिरुरच्या जनतेला दिलेले विकासाबाबत दिलेली आश्वासने पूर्ण करता आली याचे मला विशेष समाधान आहे. शिवशंभू विचारांचा आदर्श ठेवत सत्ता नाकारून मतदारांनी दिलेला आशीर्वाद व नेतृत्वावरील निष्ठेला सर्वोच्च प्राधान्य देत मायबाप मतदारांचा विश्वास सार्थ ठरविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. या पुढील काळातही जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष करीत राहणार आहे, असे खासदार डॉ. कोल्हे यांनी सांगितले.संसदेत बजावलेल्या कामगिरीमुळे संसदरत्न पुरस्कार मिळाला असला तरी मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्गांचा प्रश्न मार्गी लावला असून नाशिक फाटा ते चांडोली, तळेगाव चाकण शिक्रापूर आणि पुणे शिरुर या तीनही रस्त्यांच्या कामांची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. बायपास रस्त्यांची कामे पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुले झाले आहेत. बैलगाडा शर्यतींवरील बंदी उठली आहे. त्यामुळे निवडणूक प्रचारात दिलेल्या शब्दांचीही पूर्तता केली आहे, असे खासदार डॉ. कोल्हे म्हणाले. त्याचबरोबर ३०० एकरावरील इंद्रायणी मेडिसिटीला मंजुरी मिळाली आहे. चाकणला कामगार विमा योजनेचे रुग्णालय मंजूर झाले आहे. पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. शिवनेरीच्या रोपवेसाठी राज्य सरकार आणि नॅशनल हायवेज लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लि. यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.

### संसदरत्न पुरस्कार सोहळा संपन्न

**» वढु तुळापूरच्या छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधी स्थळाच्या विकासासाठी निधी मंजूर झाला आहे, असे सांगून खासदार डॉ. कोल्हे यांनी शिवसंस्कार सृष्टी व इतर अनेक प्रकल्प आपल्याला पूर्ण करायचे आहेत. त्यासाठी पुढील काळात काम करणार असल्याचे सांगितले.कर्तव्यपूर्तीचे समाधान आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा हा पुरस्कार मी शिरूर लोकसभा मतदारसंघातील मायबाप जनतेला समर्पित करतो अशा शब्दांत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.आज नवी दिल्ली येथे संसदरत्न पुरस्कार सोहळा संपन्न झाला.**

# भरधाव वाहनांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करा

## सस्तंग रोडवर उपाययोजनांची गरज; नागरिकांची मागणी

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
चिखली परिसरातील सोनवणे वस्ती, पिंगळे चौक सस्तंग रोड या परिसरात आजुबाजूला लोकवस्ती, तीन ते चार शाळा आहेत. या रस्त्यावर वाहने सुसाट असल्याने अपघाताचा धोका आहे. मागील आठवड्यात अपघातही झाला आहे. या भरधाव वाहनांना प्रतिबंध करण्यासाठी पोलिस प्रशासन आणि महापालिका प्रशासनाने उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली जात आहे. पिंगळे चौक सत्संग चोवीस मीटर रोड केलेला आहे. या रोडच्या बाजूला सोसायट्या,व्यावसायिक, शाळा आहेत. या ठिकाणी मुले-मुली शाळेत ये-जा करतात. भरधाव वाहनांचा वेग पाहता नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन कधी-कधी रस्ता ओलांडावा लागतो. या रस्त्यावर वाहतूक कोंडीही मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास होतो आहे.



**" रस्त्याच्या कडेला आमची पार्श्व सोसायटी आहे. या रस्त्यांवरील भरधाव वाहनांनामुळे अनेकदा अपघात घडले आहेत. सोसायटीच्या प्रवेशद्वाराबाहेर पडणे कठीण होते. लहान मुलांना तर आम्ही सोसायटीच्या बाहेर पडू देत नाहीत. दुचाकीस्वारांकडून सुसाट गाड्या पळवल्या जातात. या वाहनांच्या वेगावर प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना कराव्यात.**
**-आशिष सोनवणे, पार्श्व सोसायटी**

**" या रस्त्यावर अतिवेगात वाहने चालविल्यामुळे मागील आठवड्यात दुचाकीचा अपघात झाला. त्यामध्ये वाहनचालक जखमी झालेला. भरधाव वाहनांना प्रतिबंध घालण्यासाठी वाहतूक पोलिस विभागाकडून उपाययोजना करणे आवश्यक आहे. आजुबाजूला शाळा असल्याने विद्यार्थ्यांच्या आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना कराव्यात.**
**-जितेंद्र यादव, सामाजिक कार्यकर्ते**

**" या रस्त्यावरील भरधाव वाहनांचे निरीक्षण केले जाईल. योग्य त्या उपाययोजना करून वाहनांचा वेग कमी केला जाईल.याबाबतचे निवेदन वाहतूक विभागाला द्यावे.**
**-सुनील टोणपे,**
**वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक**

# भाजपचे आमदार, खासदार आमच्यासोबत

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचा खळबळजनक दावा

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

भाजपचे काही विद्यमान आमदार आणि खासदार काँग्रेस सोबत असल्याचा खळबळजनक दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. ज्यावेळी आम्ही हातोडा मारू तेव्हा तुम्हाला दिसेलच असं त्यांनी म्हटलं आहे. नाना पटोले हे लोणावळ्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. मुंबईत लोकसभेच्या तीन जागा मागितल्या असल्याचा त्यांनी उल्लेख केला असून जागा वाटपाचा विषय लवकरच संपवणार आहोत. असे देखील त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, लोणावळ्यातील काँग्रेसच्या शिबिरात सात आमदार गैरहजर होते. याबाबत देखील त्यांनी खुलासा केला आहे.नाना पटोले म्हणाले, काही वैयक्तिक कारणामुळे लोणावळ्यातील शिबिरात काही आमदार येऊ शकले नाहीत. गैरहजर असलेल्या आमदारांची संख्या सात आहे. गैरहजर पदाधिकारी आणि आमदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावणार आहोत. सध्या काँग्रेस पक्षातून भाजपात काही जण जाणार असल्याची शक्यता असल्याचा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यानंतर, पटोले म्हणाले की, काँग्रेस पक्षाला कोण येतंय आणि कोण जातंय याने फरक पडत नाही. नवीन मतदार हे राहुल गांधींचे चाहते आहेत. तरुणांचे आयुष्य मोदींनी उध्वस्त केलं. त्यामुळे ही तरुण पिढी महाविकास आघाडीच्या पाठीशी असल्याचे ठाम मत पटोले यांनी व्यक्त केले.पुढे ते म्हणाले, काँग्रेस पक्षाचा आगामी लोकसभेसाठी सर्व्हे सुरू झाला आहे. आम्ही जिंकणाऱ्या उमेदवाराला उमेदवारी देणार आहोत. मेरीटच्या आधारे निर्णय घेणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केले. पुढे ते म्हणाले, महाराष्ट्रात भाजप दोन जातीत भांडण लावून देत आहे. समाजात तेढ निर्माण करत आहे. शाहू फुलेंचा विचार संपवण्याचे पाप याच भाजपने केलं आहे. यांची सत्तेची मस्ती ही जनताच उतरवेल. त्यांना जनता माफ करणार नाही. अस स्पष्ट पणे नाना पटोले यांनी सांगितलं.केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या खोटारडेपणाला देशातील शेतकरी, बेरोजगार युवक वैतागले आहेत. निवडणूक रोखे योजना रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने भाजपचा भ्रष्टाचारी चेहरा जनतेसमोर आणला आहे. येत्या निवडणुकीत जनता भाजपला जागा दाखवून देईल, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी केली. शहरात आयोजित महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी पटोले बोलत होते. शिबिरात बूथ लेव्हलपासून संघटनाबांधणी कशी करायची याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.पटोले म्हणाले, की दिल्लीमध्ये महिला कुस्तीगीर यांच्यावर लैंगिक अत्याचार झाले. महिला शोषणाचे प्रमाण वाढले आहे. केंद्रीय संस्थांचा वापर करत पक्ष फोडण्याचे आणि आमदार पळवण्याचे काम भाजप करत आहे. प्रथम भ्रष्टाचाराचे आरोप करायचे आणि नंतर त्यांना सोबत घ्यायचे असे धोरण असून, जनतेचे प्रश्न मांडणाऱ्यांवर हल्ले करायचे अशी तानाशही व्यवस्था प्रस्थापित केली आहे. शिबिरामध्ये न सांगता गैरहजर राहिलेल्या आमदारांना पक्षाकडून करणे दाखवा नोटीस देण्यात येणार असल्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सांगितले असल्याचे स्पष्ट केले आहे, याकडे पटोले यांनी लक्ष वेधले. दोन जातींमध्ये भांडणे लावण्यात आली असून, महाराष्ट्र जाळण्याचे पाप भाजप करत आहे. जनता निवडणुकीची वाट पाहत असून, महाराष्ट्र मोदी सरकारला दरवाजे बंद करण्यात अग्रेसर असेल, असेही पटोले म्हणाले.



# अजितदादांनी तीनवेळा शब्द देऊन पाठीत खंजीर खुपसला

## आता विधानसभेला आमचं काम केलं तरच लोकसभेला मदत करू

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**





आता आम्ही महायुतीत आहोत, पण महाविकास आघाडीमध्ये असताना अजित पवारांनीआम्हाला तीन वेळी शब्द दिला होता, आणि तो नंतर फिरवला, आमची फसवणूक केल्याचा थेट आरोप इंदारपूरचे भाजप नेते हर्षवर्धन पाटलांच्या कन्या अंकिता पाटलांनी दिला. तुम्ही आमचं विधानसभेला काम केलं तरच आम्ही लोकसभेला तुम्हाला मदत करू असंही त्या म्हणाल्या. तर काहीही झालं तरी आम्ही इंदापूरची विधानसभा लढवणारच असं वक्तव्य हर्षवर्धन पाटलांचे पुत्र राजवर्धन पाटलांनी केलंय. त्यामुळे बारामती लोकसभेच्या जागेवरून आता अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील गटामध्ये कलगीतुरा रंगल्याचं चित्र आहे. बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांचा उमेदवार जो असेल त्याचेच काम करावे लागेल असं अजित पवार सातत्याने म्हणत आले आहेत. आता त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार याच बारामती लोकसभेच्या उमेदवार असतील हे जवळपास निश्चित झालं आहे. मात्र ज्यांच्या त्रासाला कंटाळून भाजपमध्ये गेले त्या हर्षवर्धन पाटलांची मात्र यामुळे गोची होत असल्याचं दिसून येतंय. हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील म्हणाल्या की, या आधी आम्ही महाविकास आघाडीमध्ये होतो. त्यावेळी तीन वेळा आम्हाला शब्द देऊन तो फिरवण्यात आला, आमची फसवणूक करण्यात आली, आमच्या पाठीत खंजीर खुपसला. आता आम्ही महायुतीमध्ये आहोत. त्यामुळे विधानसभेला जे आमचे काम करतील त्यांनाच आम्ही लोकसभेला मदत करू. गेल्या विधासभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या दत्ता भरणे यांनी हर्षवर्धन पाटलांचा पराभव केला होता. हर्षवर्धन पाटलांच्या पराभवामागे अजित पवारांचा मोठा हात होता हे उघड झालं आहे. आता अजित पवार हे महायुतीत गेल्यानंतर इंदापूरच्या जागेवरून तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे. असं असलं तरीही २०२४ सालची विधानसभा आम्ही लढवणारच असं वक्तव्य हर्षवर्धन पाटलांचे पुत्र राजवर्धन पाटलांनी केलं आहे. बारामती लोकसभेसाठी अजित पवारांनी पूर्ण तयारी केली असून त्या ठिकाणी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार याच उभ्या असतील हे जवळपास निश्चित झालं आहे.

# आरटीईअंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत बदल

## शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांचे स्पष्टीकरण

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) सुधारणेने प्रचलित कायद्याप्रमाणे खाजगी शाळांमध्ये होत असलेले प्रवेश बंद करण्यात आलेले नाहीत. शासकीय शाळा नजीकच्या परिसरात नसल्यास तेथील खाजगी शाळांमध्ये आरटीईअंतर्गत प्रवेश होणारच आहेत. तसेच त्या प्रवेशापोटी भरपाई देण्याची तरतूदही कायम आहे, असे स्पष्टीकरण शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले.शिक्षण विभागाने आरटीईअंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत बदल केले आहेत. त्या बदलांबाबत शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातून साधकबाधक चर्चा करण्यात येत आहे. बदलांनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची प्रवेशप्रक्रिया राबवली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मांढरे यांनी सविस्तर भूमिका मांडत स्पष्टीकरण दिले.शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ६ मे २०२२ रोजी झालेल्या बैठकीत शिक्षण हक्क अधिनियमाच्या क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणीचा




सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यावेळी अनेक शासकीय, अनुदानित शाळांमध्ये चांगल्या सुविधा असूनही देखील त्या शाळा शिक्षण हक्क अधिनियमात समाविष्ट नसल्याने तेथील पटसंख्या कमी होत असणे, ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत प्रवेश दिला जातो त्या शाळांमधील केवळ शैक्षणिक फी शासन भरपाई करत असून अन्य कोणताही खर्च दिला जात नसल्याने विद्यार्थी तिथल्या अन्य सुविधांपासून वंचित असणे, काही पालक विशिष्ट शाळांसाठी आग्रही असणे, राज्यात एक लाखाहून अधिक शाळा असताना केवळ आठ हजार शाळा आरटीइ अंतर्गत समाविष्ट असणे, आरटीईची भरपाई आठवीपर्यंत असल्याने या मुलांची नववी-दहावीची काही शाळांची फी पालकांना परवडत नसणे अशा विविध बाबींवर विचार करण्यात आला. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये पूर्व प्राथमिक आस्थापनाही प्राथमिक शाळांना जोडून घेण्याबाबतही विचार करण्यात आला. अन्य राज्यांतील या संदर्भातील तरतुदी तपासून पाहण्याचे ठरले. त्यानुसार कर्नाटक, हरियाणा, पंजाब अशा विविध राज्यांमध्ये या कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या स्वतंत्र कायद्यांच अभ्यास करण्याचे ठरले. या सर्व घटकांचा सारासार विचार करून १४ फेब्रुवारी २०२३ रोजी शासनाकडे सविस्तर प्रस्ताव पाठवण्यात आला. त्या नंतर या विषयावर शासन, प्रशासन स्तरावर दोन वर्षांपासून विचारमंथन सुरू होते. त्यामुळे कोणी संघटनांनी दोन महिन्यापूर्वी निवेदन दिले आणि हा निर्णय घेतला असे स्वरूप याला देणे वस्तुस्थितीला धरून नाही, असे मांढरे यांनी सांगितले.शासकीय शाळा अनुदानित शाळा, अंशत अनुदानित शाळा यांचे शिक्षण व्यवस्थेमध्ये प्रमाण आणि योगदान मोठे आहे. असे असताना त्या शाळा या कायद्याच्या व्याप्तीतून दूर ठेवून केवळ विशिष्ट खासगी शाळांपुरता हा कायदा मर्यादित करणे ही भूमिका न्यायाची नाही. त्यामुळे जवळपास १८ लाख विद्यार्थ्यांचे प्रवेश पहिलीमध्ये होत असताना त्यापैकी केवळ ८५००० विद्यार्थी या कायद्याद्वारे शाळांमध्ये प्रवेशित होत आहेत. दुसरीकडे शासकीय शाळा, अनुदानित शाळा, अंशतः अनुदानित शाळा या शाळांवर शासनाचा मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असताना त्या शाळेतील पटसंख्या पुरेशा प्रमाणात नाही ही विसंगती दूर करणेही गरजेचे आहे. या स्थितीचा सारासार विचार करून व सर्व राज्यांचा अनुभव विचारत घेऊन नवीन सुधारणा या कायद्यात करण्यात आली आहे, असे त्यांनी नमूद केले. या सुधारणेने प्रचलित कायद्याप्रमाणे खाजगी शाळांमध्ये होत असलेले प्रवेश बंद करण्यात आलेले नाहीत./ज्या खाजगी शाळेच्या नजीकच्या परिसरात शासकीय शाळा नाही तेथील खाजगी शाळांमध्ये हे प्रवेश होणारच आहेत.

### इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचे प्रभावी प्रयत्न

**» शासकीय अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांच्या दर्जाबाबत अवाजवी नकारात्मक प्रदर्शित मते प्रदर्शित केली जात असल्याचे दिसून येत आहे. या शाळांमधून उत्तमरित्या शिक्षण घेऊन विद्यार्था शिष्यवृत्ती आणि अन्य परीक्षांमध्ये उत्तम कामगिरी करत आहेत. राज्यभरात बहुतांश विद्यार्थी प्राथमिक शिक्षण अशा शाळांमधूनच यशस्वीरित्या पूर्ण करीत आहेत. या शाळांतूनही इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचे प्रभावी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे या दोन्हीचा सुवर्णमध्य नवीन सुधारणेने साधला गेला आहे, असे मांढरे यांनी स्पष्ट केले.**

# अजित पवारांना जेलमध्ये जावं लागेल म्हणून भाजपसोबत गेले

## शरद पवार गटाचे नेते, आमदार रोहित पवार यांचा आरोप

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अजित पवार हे जेलमध्ये जायला लागू नये म्हणून भाजप सोबत गेले. अजित पवारांचं घ्या किंवा इतर सर्व नेत्यांचं घ्या त्यांच्यावर काय- काय कारवाया झाल्या हे सर्वांना माहीत आहे. त्यांना जेलमध्ये जाण्याची भीती होती. जेलमध्ये जायला लागू नये म्हणून ते भाजपसोबत गेले असं विधान शरद पवार गटाचे नेते, आमदार रोहित पवार यांनी केलं आहे. ते आळंदी येथे बोलत होते.भाजप सोबत जाण्यासाठी मलाही काही ऑफर असतील ना? असं सूचक विधान ही त्यांनी केलं. महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी ८४ वर्षाचे शरद पवार लढत आहेत. मग आपण पळून जाऊन कसे चालेल. मराठी माणूस हा कधी पळून जात नाही. हे आपण ऐकलं आणि पाहिलं आहे. आम्ही देखील जेलला घाबरत




नाही. कारण आम्ही काही चुकीचं केलंच नाही. असं रोहित पवार यांनी स्पष्ट केले.रोहित पवार म्हणाले, अनेक नेते भाजपासोबत गेले. अजित पवारांबाबत घ्या किंवा इतर नेते भाजपसोबत गेले त्यांच्यावर काय-काय कारवाया झाल्या आहेत हे सर्वांना माहिती आहे. त्यांना भीती होती. जेलमध्ये जावं लागेल की काय? जेल ला जायला नको म्हणून त्यांनी भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला. आधी शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून भाजपच्या विरोधात बोलत होते. आता सत्तेत जाऊन मोदी सरकार मोठं वाटत आहे. हे नेते स्व:हितासाठी पक्ष बदलतात. असे रोहित पवार म्हणाले.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीमध्ये भरसभेत नागरिकांना भावनिक आवाहन केल्याचे बघायला मिळाले. यावर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अजित पवार अशा पद्धतीने नागरिकांना भावनिक करतील असे वाटले नव्हते. अजित पवार यांनी घेतलेला निर्णय नागरिक आणि पवार कुटुंबीयांना आवडलेला नाही. भाजपला जे जमलं नाही ते अजित पवारांच्या माध्यमातून भाजपने पवार विरुद्ध पवार असा संघर्ष उभा करुन केलं आहे, असेही रोहित पवार म्हणाले. रोहित पवार हे आळंदीत प्रसार माध्यमांशी बोलत होते.